# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.03.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

- विविध विषयांवरील अर्थसंकल्पोत्तर चर्चासत्रांमध्ये पंतप्रधानांचा सहभाग
- चालू शतकाच्या सहामाहीपूर्वी देशाला विकसित राष्ट्र बनवण्याचं राष्ट्रीय ध्येय - राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- महिला अनुकूल ग्रामपंचायत उपक्रमाचा आज प्रारंभ
- कॅनडा, मेक्सिको आणि चीनवर अमेरिकेकडून करवाढ लागू

  आणि
- चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत ऑस्ट्रेलियावर मात करत भारताची अंतिम फेरीत धडक

**पंतप्रधान वेबिनार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज रोजगारावरील अर्थसंकल्पोत्तर वेबिनारमध्ये सहभागी होतील. लोकांमध्ये गुंतवणूक, अर्थव्यवस्था नवोन्मेष हा या चर्चासत्राचा विषय असून यावेळी पंतप्रधान उपस्थितांना संबोधित करतील. रोजगार निर्मिती हा सरकारचा प्रमुख विषय असून, पंतप्रधानांच्या दूरदृष्टीमुळे सरकारने रोजगार वाढीला चालना देण्यासाठी आणि रोजगारासाठी अधिक संधी निर्माण करण्याची अनेक पावले उचलली आहेत. या चर्चासत्रामधून सरकार, उद्योग, शैक्षणिक संस्था आणि नागरिक यांच्यामधील सहकार्य वृद्धिंगत करून, परिवर्तनकारी अर्थसंकल्पीय घोषणा प्रभावी उपाययोजनांमध्ये परावर्तित करण्यासाठीच्या चर्चेला प्रोत्साहन देईल.

**पंतप्रधान अर्थसंकल्प**

गेल्या दहा वर्षात देशानं सुधारणा, आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि सर्वसमावेशक विकासासाठी सातत्यपूर्ण वचनबद्धता राखली असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांसदर्भात आयोजित अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला संबोधित करताना ते बोलत होते. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग हे विकासाचे इंजिन म्हणून उत्पादन, निर्यात, अणु ऊर्जा मोहिमा, नियामक, गुंतवणूक आणि व्यवसाय सुलभता हा या चर्चासत्राचा विषय होता. देशाला स्वावलंबी करण्याच्या दृष्टीकोनासह केंद्र सरकार कार्यरत आहे आणि सुधारणांचा वेगही वाढला असल्याचं पंतप्रधान म्हणाले. विकासासाठी स्थिर धोरण आणि चांगले व्यावसायिक वातावरण महत्त्वाचे असल्याचं पंतप्रधानांनी नमूद करताना व्यवसाय सुलभीकरणाच्या विविध उपाययोजनांवर मोदी यांनी प्रकाश टाकला. सरकारनं जन विश्वास कायदा लागून केला असून सरलीकृत उत्पन्न कराची संकल्पना सादर केली. उत्पादन आधारित पीएलआय योजनेचा 14 क्षेत्रांना फायदा होत असल्याचं अधोरेखित करून पंतप्रधानांनी उत्पादन आणि निर्यातीला प्रोत्साह देणाऱ्या दोन मोहिमा सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला.

**राष्ट्रपती महसूल**

चालू शतकाच्या पहिल्या सहामाहीपूर्वी भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचं राष्ट्रीय ध्येय असून, ते साध्य करण्यासाठी शैक्षणिक संस्थांच्या सर्व भागधारकांना आणि विद्यार्थ्यांना जागतिक मानसिकता ठेवून मार्गक्रमण करावे लागेल असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी काल केलं. राष्ट्रपती भवनामध्ये आयोजित दोन दिवसीय अभ्यागत परिषदेच्या समारोप प्रसंगी त्या बोलत होत्या. तर राष्ट्रपती भवनात आयोजित दुसऱ्या कार्यक्रमात मूर्मू यांनी भारतीय महसून सेवेतील अधिकारी प्रशिक्षणार्थींना संबोधित केलं. त्यावेळी बोलताना देशाचा शाश्वत आणि सर्वसमावेशक विकास करण्यासाठी संसाधनांचं कार्यक्षमतेनं आणि निष्पक्षतेने व्यवस्थापन केलं पाहिजे असं सांगून देशातल्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ होत असून डिजीटल कनेक्टिव्हिटीमुळे दरी भरून निघत आहे तसंच आर्थिक संधी पुर्वीपेक्षा अधिक सुलभ झाल्या असल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल ब्रिटनचे पंतप्रधान केअर स्टारमर यांची भेट घेऊन उभय देशांदरम्यान द्वीपक्षीय आर्थिक सहकार्य पुढे नेण्यावर आणि लोकांच्या देवाणघेवाण वाढवण्यावर चर्चा केली. त्यानंतर समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशामध्ये स्टारमर यांनी युक्रेन संघर्षावर ब्रिटनचा दृष्टीकोन सामाईक केल्याचं नमूद केलं. त्यानंतर जयशंकर यांनी त्यांचे समकक्ष ब्रिटनचे परराष्ट्र सचिव डेव्हिड लॅमी यांची भेट घेत पुढील चर्चेची उत्सुकता व्यक्त केली.

**मध्य रेल्वे - सुरक्षा  पुरस्कार**

मध्य रेल्वेच्या 11 कर्मचाऱ्यांना सुरक्षा पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं आहे. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथे मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धरमवीर मिना यांच्या हस्ते काल हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. कल्याण स्थानकात, सिग्नल आणि दूरसंचार विभागात कनिष्ठ अभियंता पदावर  कार्यरत असलेल्या साक्षी गुप्ता यांना विशेष पुरस्कार देण्यात आला. या पुरस्कारार्थिंनी, आपल्या कर्तव्याप्रती दाखवलेलं समर्पण आणि दक्षता प्रशंसनीय आणि प्रेरणादायी आहे असं मिना या प्रसंगी बोलताना म्हणाले.

**महिला-पंचायत**

नवी दिल्लीत आज होणाऱ्या राष्ट्रीय परिषदेत, पंचायती राज मंत्रालयातर्फे महिला-अनुकूल ग्रामपंचायत उपक्रमाचा आरंभ करण्यात येणार आहे.  हा उपक्रम मंत्रालयाच्या यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाचा एक भाग आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान एक महिला-अनुकूल ग्रामपंचायत स्थापन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. हे लिंग-संवेदनशील आणि मुली-अनुकूल प्रशासन पद्धतींसाठी एक दीपस्तंभ म्हणून काम करेल. या उद्घाटनपर कार्यक्रमात पंचायती राज राज्यमंत्री एस.पी. सिंग बघेल, आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल, तसंच संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधीसारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

**अमेरिका कर**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या सर्वात मोठ्या तीन व्यापारी भागीदार देशांविरोधात व्यापार युद्धाचं रणशिंग फुंकलं आहे, त्यामध्ये कॅनडा, मेक्सिको आणि चीनचा समावेश आहे. ट्रम्प यांनी मेक्सिको, कॅनडा या देशांच्या आयातीवर 25 टक्के कर लादला आहे तर कॅनडाच्या वीजेवरचा कर 10 टक्कांपर्यंत मर्यादित केला आहे. तर गेल्या महिन्यात चीनी उत्पादनांवरून लादलेला कर दुप्पट करत 20 टक्के केला होता. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो यांनी या संदर्भात अमेरिकेने दिलेले स्पष्टीकरण नाकारले असून, अमेरिकेने कॅनडाविरुद्ध व्यापार युद्ध सुरू केल्याचं म्हटलं असून, कॅनडा 21 दिवसांच्या कालावधीत 100 डॉलर्सपेक्षा अधिक किंमतीच्या अमेरिकन वस्तूंवर कर लादणार असल्याचं ट्रुडो यांनी वार्ताहर परिषदेत बोलताना स्पष्ट केलं. त्यानंतर अमेरिकेचे वाणिज्य सचिव लुटनिक यांनी अमेरिका, या संदर्भात कॅनडा आणि मेक्सिको यांची भेट जाहीर करेल असं एका वाहिनीशी बोलताना सांगितलं. मात्र लादलेले शुल्क थांबवणार नाही, मात्र अध्यक्ष ट्रम्प तडजोड करू शकतील असेही म्हटले आहे. तर मेक्सिकन राष्ट्राध्यक्ष क्लॉडिया शीनबॉम यांनी मेक्सिको नवीन करांना स्वतःच्या प्रत्युत्तरात्मक शुल्काने प्रतिसाद देईल असं म्हटलं आहे. दरम्यान, राष्ट्राध्यक्ष पदाची सूत्र स्वीकारल्यानंतर आज ट्रम्प आज प्रथमच अमेरिकेच्या संसदेला संबोधित करत असून, अमेरिकेचा सुवर्णकाळ परत आला असून अमेरिकेविषयी विश्वास आणि सन्मान परतला असल्याचं प्रतिपादन त्यांनी केलं आहे.

**झेलेन्स्की**

गेल्या आठवड्यात अमेरिका आणि युक्रेन देशांच्या राष्ट्राध्यक्षांच्या तणावपूर्ण बैठकीनंतर, युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली कायमस्वरुपी शांतता प्रस्थापित करण्यासाठी काम करण्यास तयार असल्याचं म्हटलं आहे. अमेरिकेने युक्रेनला केली जाणारी लष्करी मदत थांबवल्यानंतर पहिल्यांदाच शांतता करारावर वाटाघाटी करण्याची तसंच खनिज करारावर स्वाक्षरी करण्याची युक्रेन तयार असल्याचंही म्हटलं आहे. समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशात युक्रेनच्या राष्ट्राध्यक्षांनी बैठक खेदजनक झाल्याचं म्हटलं असून भविष्यात रचनात्मक सहकार्य करण्याचं आवाहन केलं आहे.

**पाकिस्तान - बॉम्बस्फोट**

पाकिस्तान मधील वायव्य खैबर पख्तूनख्वा प्रांतात काल  झालेल्या आत्मघातकी बॉम्बहल्ल्यात 12 जण ठार आणि 30 जण जखमी झाले. मृतांमध्ये  चार बालकांचा समावेश आहे. बन्नू कॅन्टोनमेंट परिसरात स्फोटकांनी भरलेली दोन वाहन कॅन्टोनमेंटच्या सीमा भिंतीवर धडकवण्यात येऊन हा हल्ला घडवण्यात आला. जैश – अल – फुरसान या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे.

**बॅंडमिंटन**

भारताचा बॅंडमिंटनपटू किदम्बी श्रीकांतने फ्रान्समधील ऑर्लियन्स इथं झालेल्या दोन्ही पात्रता सामन्यांमध्ये विजय मिळवत मुख्य फेरीत प्रवेश मिळवला आहे. श्रीकांतनं  दोन सामन्यांमध्ये अनुक्रम मॅड्स क्रिस्टोफरसनचा आणि अर्नोड मर्कलेचा असा पराभव केला. शंकर सुब्रमणियम यानेही मुख्य फेरीत प्रवेश केला. महिला एकेरीच्या पात्रता फेरीत, तान्या हेमंतने तिचा पहिला सामना जिंकला पण दुसरा सामना गमावला. तिसऱ्या मानांकित आकर्शी कश्यपलाही पराभव पत्करावा लागला.

**क्रिकेट**

आयसीसीच्या चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत काल दुबई इथं झालेल्या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा 4 गडी राखून पराभव करत अंतिम फेरी गाठली आहे. ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना कर्णधार स्टीव्ह स्मिथ आणि अलेक्स कॅरी यांच्या अर्धशतकाच्या जोरावर 264 धावा केल्या. भारताकडून मोहम्मद शमीने 3 तर वरुण चक्रवर्ती आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी 2 बळी घेतले. प्रत्युत्तरादाखल भारताने सहा गड्यांच्या मोबदल्यात हे उद्दिष्ट पार केलं. विराट कोहलीने संयमी 84 धावा केल्या तर श्रेयस अय्यरच्या 45 , के एल राहुलच्या 34 चेंडूतील 42 आणि हार्दिक पांड्याच्या 24 चेंडूतील 28 धावांनी भारताने सहज विजय साकारला. विराट कोहलीला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आलं. भारताचा अंतिम फेरीतील सामना आज होणाऱ्या दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यातील विजेत्या संघाशी येत्या 9 मार्च रोजी दुबईत होणार आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरील बातमीपत्र संपलं**